मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी पंचमुखी महादेव मंदिरात भाविकांची गर्दी



**जालना । प्रतिनिधी -** श्रावण महिन्याचा शेवटचा सोमवार असल्याने आज पंचमुखी म हादेव मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी उसळली. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांनी पहाटेपासून रांगा लावून महादेवाचे दर्शन घेतले. ' नमः शिवाय' आणि 'हर हर महादेव' च्या गजरात मंदिर परिसर भक्तिभावाने दुमदुमून गेला.

महादेवाच्या पंचमुखी रूपाचे दर्शन घेण्यासाठी जालना शहरासह ग्रामीण भागातील तसेच बाहेरील जिल्ह्यातूनही भाविक मोठ्या संख्येने आले होते. मंदिर समिती व प्रशासनाच्या वतीने सुरक्षा व्यवस्था, पाणीपुरवठा, रांग व्यवस्थापन, स्वच्छता यांची विशेष काळजी घेण्यात आली. भाविकांनी बेलपान, दूध, फुले अर्पण करून अभिषेक केला. महिलांनी ओवाळून नवस पूर्ण केला, तर तरुणाईने रांगेत भक्तिगीतांचा जप करत वातावरण अधिक पवित्र केले. अनेकांनी कुटुंबासह दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली. दरम्यान, श्रावणाचा शेवटचा सोमवार हा म हादेवाला विशेष प्रिय मानला जात असल्याने आजचा दिवस धार्मिकदृष्ट्या महत्वाचा असल्याचे पूजाऱ्यांनी सांगितले. दिवसभरात हजारो भाविकांनी पंचमुखी महादेवाचे दर्शन घेऊन समाधान लाभल्याचे भाविकांनी व्यक्त केले.

# जालना जिल्ह्यात 'कोसळ'धार



### पुंडलिका नदी दुथडी भरुन; बंधाऱ्यांमधून विसर्ग वाढ

**जालना । प्रतिनिधी -** कालच्या रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे जालना जिल्ह्यातील पुंडलिका नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीकाठच्या गावांमध्ये पाणीपातळी वाढल्याने नागरिकांमध्ये काही प्रमाणात चिंता पसरली आहे. जालना जिल्ह्यात मागील २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक बंधारे शंभर टक्के क्षमतेने भरले असून, नदीपात्रात मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात येत आहे. जिल्ह्यात सरासरी ३५.९० मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे नद्या-नाल्यांना पूरस्थिती निर्माण झाली असून प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.

पावसाची तालुकानिहाय नोंद (मिमीमध्ये) जालना - ३२.०० (एकूण ५२८.६०), बदनापूर - ५३.४० (एकूण ५०९.७०), भोकरदन - २५.०० (एकूण ४१८.५०), जाफ्राबाद - २९.७० (एकूण ४९४.७०),

परतूर - १२.१० (एकूण ४७३.६०), मंठा - २१.७० (एकूण ४६२.१०), अंबड - ५१.७० (एकूण ४५०.००), घनसावंगी - ४८.६० (एकूण ५०२.००), आजपर्यंत जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पावसाच्या ७९.२१% पावसाची नोंद झाली आहे.

**महत्त्वाचे बंधारे व विसर्ग परिस्थिती**

जोगलादेवी बंधारा (ता. घनसावंगी) : पूर्ण क्षमतेने (१००%) भरला असून २ दरवाजे उघडले, १४,४५२ क्यूसेक विसर्ग.

राजाटाकळी बंधारा (ता. घनसावंगी) : ३ दरवाजे उघडले, ३४,३१२ क्यूसेक विसर्ग.

पाथरवाला बंधारा (ता. अंबड) : १ दरवाजा उघडला, ५,५३३ क्यूसेक विसर्ग.

मंगरूळ बंधारा (ता. घनसावंगी) : २ दरवाजे उघडले, २०,००० क्यूसेक विसर्ग.

लोणी सावंगी बंधारा (ता. जालना) : सकाळी ८.३० वाजता गेट क्र. ०९ पूर्णपणे उचलले. गेट क्र. ०३, ०६ व ०९ मधून मिळून एकूण ४०,१४० क्यूसेक विसर्ग सोडला.

जिल्ह्यातील सर्व प्रमुख बंधारे शंभर टक्के भरले असून, नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात येत आहे. नागरिकांनी नदीपात्र व धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे प्रशासनाचे आवाहन आहे.

जालना जिल्ह्यात म ुसळधार पाऊस - २००% क्षमतेने बंधारे भरले, विसर्गाम ुळे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले असून प्रशासन सतर्क आहे.

### जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान

## शेतकऱ्यांना व नागरिकांना तातडीने पंचनामे करून मदत द्यावी

### खासदार डॉ. काळे यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** १४ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती व मालमत्तेचे नुकसान झाले आहे.



या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जालना यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना व इतर पीडितांना तातडीने पंचनामे करून योग्य मोबदला देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रम ाणे, १४ ऑगस्टच्या रात्रीपासून ते १७ ऑगस्टदरम्यान तब्बल १०० मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे तलाव, नाले, ओढे, धरणे तुडुंब भरून वाहू लागली. परिणामी जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

प्राथमिक अहवालानुसार, जिल्ह्यातील सुमारे २०० हून अधिक गावे अतिवृष्टीमुळे बाधित झाली असून, सोयाबीन, मका, तुर, बाजरी व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय ग्रामीण भागातील घरे, जनावरांच्या गोठ्यांना, बाजारपेठा, दुकाने, तसेच रस्ते व पूल यांनाही हानी पोहोचली आहे.

या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त शेतकरी बांधव व इतर प्रभावित नागरिक/व्यावसायिक यांचे तातडीने पंचनामे करून शासनमान्य निकषांनुसार त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

### युवा आदर्श

### नादान ...

शांतीदूत अद्वितीय
करे कपोत सन्मान
दिसेखास गिर्रेबाज
तिरकस करुन मान
दाणे टिपता शैलीत
हरपते पाहता भान
स्टायलिश तोवावर
लहानथोर रे बेभान
घुमे गुटूर्गु गुंजारव
खेचून घेते ते ध्यान
निर्माण मोठे विवाद
जरी लहानगे ध्यान
खाद्यद्या कबुतरांना
वृध्दींगत खानदान
पुण्य कमावे पुरेपूर
टाकून अल्पसे दान
सत्य उघड वेगळेचं
सांगे करुन विज्ञान
उकल केली समस्या
भ्रमिष्ट बनले सज्ञान
कशी भयानक विष्ठा
रे रोगाचेमूळ निदान
भूतदया अंगलटयेई
अस्वस्थ सर्व नादान

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट - प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** भारतीय हवामान विभाग (IMD) म ुंबईने सोमवार (दि १८) रोजी दुपारी मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा दिला आहे. त्यानुसार, परभणी, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट, तर छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि लातूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यानुसार प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**प्रशासनाला दिलेल्या सूचना**

नदीकाठावरील गावांना सतर्कतेच्या सूचना **पान २ वर**

## भाजपला नव्या उत्साही युवकांची साथ

### मस्तगड येथील तरुणांचा भाजपात जाहीर प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास ठेवून आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली म स्तगड, जालना येथील उत्साही तरुणांनी आज भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

भाजपात प्रवेश करणाऱ्यांमध्ये पियुष मुंगसे, यश मस्के, हरिओम डोळझाके, साई कासार, मंथन यादव, कुशल श्रीगादी, राहुल कुम ावत, नैतिक आंबिलवादे, शुभम रहाड, आज्ञान भगत, तनिष्क मस्के, आशिष हेलगट, वंश गाजरे, अमेय जोशी, ईश्वर तिडके, कृष्णा कुलथे, वैष्णव तायडे, वैभव कोल्हे आदी नवयुवकांचा समावेश आहे.

या प्रवेशामुळे पक्षाला नवी ऊर्जा लाभली असल्याचे सांगत जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी सर्व युवकांचे मनः पूर्वक स्वागत केले. त्यांनी म्हटले की, नव्या ऊर्जेच्या फळीमुळे पक्ष अधिक सक्षम आणि सबळ होईल. या प्रवेश सोहळ्यास शिवाजी शेजुळ, ग्रामीण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वात युवकांचा भाजपामध्ये प्रवेश



**जालना । प्रतिनीधी -** जालना विधानसभा मतदार संघाचे म ाजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जालना तालुक्यातील दरेगाव येथील अनेक युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

शहरातील प्रितीसुधा नगर मधील माजी आ. गोरंट्याल यांच्या निवासस्थानी झालेल्या या प्रवेश सोहळ्यात दरेगाव येथील अविनाश धोत्रे, संजय ढवळे, अमोल पडोळ, राहुल सरोदे, दिनेश लष्कर, गणेश सरोदे, सतीश धोत्रे, गणेश कोल्हे, अजय लष्कर, योगेश शिसुदे, सूरज लष्कर, कृष्णा बोरुळे, राम बुचळे, अर्जुन धोत्रे, दिलीप जाधव, रोहन शिंदे, राहुल राठोड, अभिषेक गुंजाळ आदींचा समावेश असून या सर्वांचे गोरंटयाल यांनी भाजपाचा रुमाल देवून स्वागत करून आगामी काळात भाजपचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी युवानेते अक्षय गोरंटयाल, शिवाजी शेजुळ, श्रीमती नम्रता थाडा - जैस्वाल, संतोष माधोले आदींची उपस्थिती होती.

### जालना सायबर पोलिसांची मोठी कामगिरी

## व्यापाऱ्याची १ कोटी २९ लाखांची फसवणूक उघडकीस

**जालना । प्रतिनिधी-** जालना शहरातील एका व्यापाऱ्याला तब्बल १ कोटी २९ लाखांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी तक्रारदार व्यापारी व्यंकटेश आईल मीलचे मालक यांनी जालना सायबर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयीत आरोपी कपील दोषी व यश दोषी यांनी सफल आईल आणि सीड्स अहमदाबादचे संचालक ललीतकुमार जैन, महाविर ॲग्रोचे संचालक नरेश शहा यांनी सोयाबीन रिफाइंड तेलाच्या मोठ्या टेंडरचे आमिष दाखवून व्यापाऱ्यांची फसवणूक केली. या व्यवहारात ९६ मेट्रिक टन सोयाबीन रिफाइंड तेलाच्या खरेदीसाठी लाखोंची रक्कम उकळण्यात आली.

सायबर पोलिसांच्या तांत्रिक तपासामध्ये, फसवणूक झालेल्या व्यापाऱ्यांची रक्कम आरोपींनी विविध खात्यांत वळविली होती. पोलिसांनी तातडीने कारवाई करत फसवणुकीची संपूर्ण रक्कम - १ कोटी २९ लाख रुपये - गोठवण्यात यश मिळवले आहे.

या प्रकरणी पोलिस अधीक्षक अजयकुमार बसल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गुणाजी शिंदे, **पान २ वर**

झाडे लावा
झाडे जगवा

# संपादकीय

## लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरु शकत नाही

लग्न न करता एकत्र राहण्याचे ( लिव्ह इन रिलेशनशिप) फॅड अलीकडे खूप वाढले आहे. विशेषतः शहरात राहणाऱ्या उच्चशिक्षित तरुण तरुणींमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे प्रमाण अधिक आहे. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये काही महिने राहून पहायचे जर एकमेकांचा स्वभाव पटला तर ठीक नाही तर ब्रेक अप करुन पुन्हा नवीन जोडीदार शोधून त्याच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचे असा हा प्रकार. ज्यांना विवाह संस्था मान्य नाही किंवा विवाह करायचा नाही असे तरुण तरुणी लिव्ह इन रिलेशनशिपला पसंती देत आहेत. केवळ अविवाहित तरुणच नाही तर घटस्फोटित व्यक्तीही लिव्ह इनमध्ये राहण्यास पसंती देत आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपकडे विवाह संस्थेला पर्याय म्हणून पाहणारा मोठा वर्ग समाजात निर्माण होत आहे. भारतीय कायद्याने लिव्ह इन रिलेशनशिपला पूर्ण मान्यता दिलेली नसली तरी लिव्ह इन रिलेशनशिप कायद्याने बेकायदेशीर किंवा गुन्हाही ठरवलेला नाही. भारतीय कायद्याने या नात्याला काही प्रमाणात संरक्षण आणि अधिकारही दिले आहेत पण हे करताना कायद्याने काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांसाठी ही मार्गदर्शक तत्वे पाळणे बंधनकारक आहे. असे असले तरी या मार्गदर्शक तत्वांचे पालन संबंधित जोडप्यांकडून होते का हा संशोधनाचा विषय आहे. मुळात लिव्ह इन रिलेशनशिपची व्याप्तीच इतकी अस्पष्ट आहे की आपल्या अधिकाराची आणि कर्तव्याची लक्ष्मणरेषाच उभयंतांना समजत नाही त्यामुळे अशा संबंधात कालांतराने कटुता निर्माण होते. दोघांचे पटेनासे होते. विवाह संबंधांमध्ये एकमेकांविषयी जो आदर असतो तो तो लिव्ह इन मध्ये नसतो. दोघेही एकमेकांवर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे वाद वाढत जातात. त्यांच्यात मध्यस्थी करणाराही कोणी नसतो त्यामुळे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांचा न्यायालयात पोहचण्याचा प्रकार अलीकडे खूप वाढला आहे. एकदा वाद न्यायायलात पोहचला की न्यायालयात हेलपाटे घालावे लागतात त्यामुळे संबंधितांचे जीवनही उध्वस्त होते. नातेवाईक, समाजातही अवहेलना होते. काही वेळा तर वाद इतका विकोप्यास जातो की वादातून खुनही होतो. दोन वर्षांपूर्वी दिल्लीतील श्रद्धा वालावकर या तरुण मुलीचा तिच्याच लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या जोडीदाराने निर्घृणपणे खून केला होता. त्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. दिल्लीतील या घटनेची नंतर पुण्यातही पुनरावृत्ती झाली होती. लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या या घटना पाहिल्या की लिव्ह इन मध्ये राहणे किती सुरक्षित आहे याचा विचार तरुणांनी करायला हवा. लिव्ह इन रिलेशनशिपला कायद्याने बेकायदेशीर ठरवले नसले तरी समाजाने अजूनही या नात्याला मान्यता दिलेली नाही. समाजाने अजूनही लिव्ह इन रिलेशनशिपला स्वीकारले नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांकडे समाज समाज कुत्सित नजरेनेच पाहतो. म्हणजे ज्या सुखासाठी लिव्ह इन रिलेशनशिपचा मार्ग स्वीकारला ते सुख तर वाट्याला येतच नाही उलट दुःखच वाट्याला येते . खरंतर लिव्ह इन रिलेशनशिपला केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून पाहिले तर कोणीही लिव्ह इन रिलेशनशिपचे समर्थन करणार नाही. स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक असतात आणि त्या पूरकतेला बळ देण्यासाठीच अनादी काळापासून विवाह संस्था अस्तित्वात आली आहे. विवाह हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. विवाह संस्कृतीत काही त्रुटी असतीलही, विवाह झालेल्या जोडप्यांमध्ये पटत नाही, त्यांच्यात वाद होत नाही असे कोणी म्हणणार नाही. नवरा बायकोमध्येही वाद होतो. काहींचा वाद न्यायालयातही जातो. काहींचा घटस्फोटही होतो म्हणून विवाहच नको, लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय आहे असे कोणी समजत असेल तर ते चुकीचे आहे. लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दोन भिन्न लिंगी व्यक्ती एकत्र राहतात पण त्यांना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान नसते. या उलट विवाह झालेल्या व्यक्तींना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान असते केवळ जबाबदारीच नाही तर प्रेम, त्याग आणि तडजोडी बरोबरच विवाहात समर्पण भावनाही असते. मात्र पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधाणुकीकरण, भौतिकवादी दृष्टिकोन, इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करून दाखवण्याची प्रवृत्ती यामुळे शहरात विशेषतः मेट्रो शहरात विवाह संस्थेवरच प्रहार केला जात आहे. आजची उच्चशिक्षित तरुण पिढी कोणत्याही जबाबदारी शिवाय बंधनमुक्त जीवन जगण्यास उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे त्यामुळेच ते लिव्ह इन कडे वळत आहेत पण ते ही अटी आणि शर्तीवर बेतलेले असल्याने ते संबंधीही फार काळ टिकत नाही त्यापेक्षा समानता, प्रेम, त्याग आणि जबाबदारीची जाणीव असलेला विवाह लिव्ह इन रिलेशनशिपपेक्षा हजारो पटींनी चांगला आहे हे लिव्ह इनकडे वळणाऱ्या तरुणांनी समजून घ्यायला हवे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आणि अण्णाभाऊ राजवाड्यात बसले

साताऱ्याला इतिहासामध्ये खुपच महत्व आहे. मराठ्यांच्या साम्राज्याच्या राजधानीचे ठिकाण म्हणून . सातारा प्रसिद्ध आहे.

साताऱ्या च्या उत्तरेला पुणे जिल्हा तर दक्षिणेला सांगली जिल्हा. पुर्वेला सोलापूर तर पश्चिमेला रायगड / रत्नागिरी हे ऐतिहासिक प्रसिद्ध जिल्हे आहेत. कृष्णा आणि कोयना या जलवाही न्या येथेच आहेत. निसर्गाने नटलेले डोंगर, झाडी, गड किल्ल्याचा हा परिसर. याशिवाय साताऱ्या मध्ये अजिंक्य गड, प्रतापसिंह हायस्कूल, राजवाडा, फाशिचा वड इ. ठिकाण प्रसिद्ध आहेत.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात या मातीचे फार मोठे योगदान आहे. येथील युवक देशसेवा करण्यासाठी हजारोंच्या संख्येने सैन्यामध्ये भरती होतात. हा शुरविरांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे.

साताऱ्यातील कास पठार दूर्मिळ फुलासाठी आणि फुलपाखरा साठी प्रसिद्ध आहे. सन २०१२ साली युनेस्कोने जागतिक वारसा असणाऱ्या स्थळामध्ये या ' कास ' पठाराचा जैव विविधतेचा भाग म्हणून सामावेश करण्यात आला आहे.

या जिल्ह्यामध्ये जगात प्रसिद्ध असणारे थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर आहे. तसेच इतिहासातील वाई, पाचगणी हे शहर याच जिल्हयात आहेत. याशिवाय काळूबाई देवीचं हेमांडपंथी बांधकाम, स्वंयभू मूर्ती म्हणजेच मांढरादेवी याच जिल्ह्यात आहे.

साताऱ्यामध्ये रामराजे यांचे दत्तक पुत्र शाहुराजे दुसरे यांचा राज्यभिषेक झाला. आणि साताऱ्याला राजगादीचे स्वरूप प्राप्त झाले.

शाहुराजे दुसरे यांचे पुत्र प्रतापसिंह, रामचंद्र, आणि शहाजी यांच्यापैकी ' प्रतापसिंह यांची कारकिर्द साताऱ्या साठी विशेष होती. हे आपल्याला अभिमानाने सांगावे लागेल.

शाहु महाराज दुसरे आणि आनंदीबाई यांचे सुपुत्र म्हणजे प्रतापसिंह होय.

प्रतापसिंहानी या स्वराज्यातील मराठेशाहीला प्रजेप्रती, रयतेप्रती उत्कृष्ठ काम केल्या चे अनेक दाखले आहेत.

प्रतापसिंहानी त्या काळी साताऱ्या मध्ये तलाव बांधून खापरी नळाने शहरामध्ये पाणि पुरवण्याचे . उत्कृष्ट काम केले. याशिवाय इंग्रजाच्या काळात मराठी मुला- मुलीना लष्करी शिक्षण देण्याचे कामही या राजांनी केले. अजिंक्य ताऱ्याच्या पायथ्याशी शहराच्या मधोमध मराठेशाही च्या इतिहासाची साक्ष देत दोन मंजली,भव्य दिव्य असा लाकडाचे नक्षीकाम असणारा, डोळ्याचे पारणे फेडणारा, सुरेख आणि कोरीव काम असणारा, मुख्य प्रवेश द्वार एक नव्हे तर तीन दिल्ली दरवाज्या प्रमाणे मोठे असणारे भव्य दिव्य राजवाडा त्यांनी बांधला. आणि आजही तो अत्यंत चांगल्या सुस्थितित आपल्याला पाहण्यासाठी उभा आहे.या राजवाड्या मध्येच प्रतापसिंह हायस्कुल ही बाबासाहेब आंबेडकर शिकलेली शाळा भरते. ज्यांनी जगाला ज्ञानाचा प्रकाश दिला. विद्येचा सागर आसतो. त्यामध्ये राजहंसाप्रमाणे सामान्य माणूस ही पोहू शकतो. हे दाखवून दिले. प्रज्ञावंत, ज्ञान सुर्य, समानतेचा वारा निर्माण करणारी पवन चक्की, समतेचा रथ तयार करणारा विचार, न्याय हक्कासाठी न्यायालय उभारणार व्यक्तीमत्व एवढेचं नाही तर संबध देश ज्या संविधानाने चालतो. ते संविधानाचे शिल्पकार, राष्ट्रनिर्माते, भारत भाग्य विधाते, यांना शिकवलेली माती ही सातारची होय.

ज्यानी -ज्यांनी या मानवाचा विचार स्विकारला त्याचं - त्याचं भलं झालचं हे निर्मळ सत्य आहे. आम्हाला माणसांमध्ये बसवण्या पासून ते मान, सन्मान, पदव्या आणि मोक्याच्या जागा प्राप्त करून देण्यात सिंहाचा वाटा उचलणारे डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हेच आपले भाग्यविधाते होय. सन १९४७ रोजी देश स्वंतत्र झाला. देशामध्ये संविधान लागू झाले. आणि देशा मध्ये हळू - हळू बदल दिसायले लागले. हे बदल वर्ण व्यवस्थे मध्ये वावरलेल्या व्यक्तीना स्विकारण्यास वेळ लागू लागला. पण वस्तू स्थिती बदलायला पाहीजे हा कायदा सांगतो. आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना ह्या गोष्टी दिसायला लागल्या.

दि १ ऑगस्ट आणाभाऊंचा जन्मदिवस. वाटेगाव जि. सांगली येथे अण्णाभाऊना वंदन करण्यासाठी लसाकम, लातूर ची टीम वाटेगाव ला गेली. येताना सातारा या ऐतिहासिक नगरीला भेट द्यायचे ठरले. आणि आम्ही अजिंक्य गड, फाशीचा वड, प्रताप सिंह हायस्कूल आणि मराठेशाहीच्या साम्राज्याची साक्ष देत उभा असलेला राजवाडा पाहण्याचा योग आला. भव्य - दिव्य राजवाडा पाहण्यासाठी गेलो असता,

जग बदल घालुनि घाव,<br>
सांगुनी गेले मज भिमराव

असे म्हणणारे साहित्य रत्न, लोकशाहीर, साहित्य सम्राट डॉ अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा राजवाड्याच्या भव्य दालनामध्ये अभिवादन करण्यासाठी ठेवल्याचे बघून मी स्तब्ध झालो.

गावाच्या कडेला राहणारा समाज, सावलीचा विटाळ होणारा समाज, गावाच्या वेशितून जाताना चपल हातात, डोक्यावर घेवून जायच्या पद्धती मध्ये वाढलेला समाज, एवढे चं काय ज्या गोष्टी ऐकणं, बघणं आणि बोलणं हे शक्य नसताना राजवाड्याच्या सावलीला, समोर, थांबण्यासाठी सुद्धा परवानगी लागायची डोळे उघडून बघणं हे सुद्धा पाप वाटायचं छत्रपतीच्या राजधानीत सर्व जाती धर्माचे मावळे होते. हे खरं आहे. आपण इतिहास वाचला आहे. पण प्रत्यक्षात लोकशाही मध्ये सर्व महापुरुषाना मानाचे स्थान आहे. त्यांच्या विचारांना प्राधान्य आहे. त्यांचा विचार स्विकारणे हे आपले कर्तव्य आहे. हे सत्य आहे. पण.. आणि पणचं... या सगळ्या बाबी मनाला स्पर्श करून केल्या. आणि माझा अण्णाभाऊ राजवाड्यात दिमाखात बसलेले पाहून धन्य - धन्य वाटले. अश्रू अनावर झाले आणि म्हणालो, 'लोकशाहीचे फळे आपण चाखत आहोत. एवढी सन्मानाची जागा मिळाली. मनपूर्व क अभिवादन केले. राजवाड्याच्या समोर त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी एक स्टेज तयार केले होते. तेथे अण्णा भाऊंचा विचार वेगवेगळ्या अभ्यासका कडून आणि वक्त्या कडून सांगितला जाणार होता. हे किती विलोभनिय दृश्य, डोळ्याला नजर प्राप्त झाल्याचं सार्थक झालं असं वाटलं.

आता खरचं सन्मानाचे दिवस पाहायला मिळायला लागलेत. सर्व समाज बांधवाना आणि बुद्ध, फुले, शाहु, बाबासाहेब, अण्णाभाऊ या विचार धारेवर काम करणाऱ्या सर्व परिवर्तन वादी संघटनासाठी हा 'प्राणवायु आहे. आपण स्फूर्ती घेवू या.

आपण आपला मान सन्मान जपणे गरजेचं आहे. ' शिक्षण हे वाघिणी चे दुध आहे. ते प्राशन करू या, संघटीत होवू या., दखल पात्र होवु या. आपले अस्तित्व निर्माण करू या. अण्णाभाऊंनी मांडलेला विचार जग बदल घालुनी घाव, सांगुनी गेले मज भिमराव ' या उक्तीचा जीवना मध्ये प्रत्यक्ष साकार करण्याचा प्रयत्न करणे हेच खरे अभिवादन ठरेल.

जयभीम ... जय संविधान

**एकनाथ पलमटे**<br>
**जिल्हाध्यक्ष**<br>
**लसाकम, लातूर**<br>
**८३७९०८३१००**

# रमाकांत मुंडे यांना पुरस्कार




**मुंबई -** शमीम खान यांनी मुंबई येथे एका भव्य कार्यक्रमात १३ वा टिफा पुरस्कार २०२५ आयोजित केला होता. यावेळी अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी उपस्थित होते. दुबईचे प्रसिद्ध उद्योगपती डॉ. बु अब्दुल्ला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बिग बॉस फेम अर्शी खान, ईशान मसीह, सौदागर फेम ज्येष्ठ अभिनेते आनंद बलराज अँडी, अभय सिन्हा, शहजाद खान, एजाज खान, दीपक पराशर, पंकज बेरी, सुनील पाल, माही शर्मा (कुमकुम भाग्य फेम), राजकुमार कनोजिया, बॉलिवूड फोटोग्राफर रमाकांत मुंडे, छायाचित्रकार चंद्रप्रकाश माझी. दिलीप सेन आणि इतर अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. सिमरन आहुजा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी शमीम खान यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. आशिकी फेम अनु अग्रवाल, अभिनेत्री अमिता यांच्यासह अनेकांचा सत्कार करण्यात आला.

टिफा पुरस्काराचे आयोजक शमीम खान म्हणाले की, दुबईचे प्रसिद्ध उद्योगपती डॉ. बु अब्दुल्ला यांनी आमच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले आहे आणि त्यांच्याकडे अनेक कंपन्या आहेत. त्यांच्याशिवाय, या कार्यक्रमात आलेल्या सर्व सेलिब्रिटींचे आम्ही आभारी आहोत. टिफा पुरस्कारात, आम्ही दिग्गज कलाकारांसह आजच्या काळातील कलाकारांचा सन्मान करतो आणि आम्ही पुरस्कारांमध्ये ही परंपरा सुरू केली आहे.

अभिनेता दीपक पराशर यांनी आयोजक शमीम खान आणि ज्युरींचे आभार मानले आणि सांगितले की, मला निकाह चित्रपटातून प्रसिद्धी मिळाली. त्यांनी निकाहमधील संवादही वाचला. उमेश कुमार, साहिल अख्तर यांचाही सत्कार करण्यात आला.

अर्शी खान म्हणाली की, जेव्हा मी बिग बॉसमधून बाहेर पडलो तेव्हा पहिला पुरस्कार, टिफा पुरस्कार, मला शमीम खान यांनी दिला. त्यांनी आम्हाला पुन्हा फोन करून आभार मानले.

अमन वर्मा म्हणाले की, शमीम खानचा कार्यक्रम खूप भव्य असतो आणि कलाकारांना पुरस्कार मिळाल्यावर अभिमान आणि प्रोत्साहन मिळते.

सर्व पाहुण्यांनी शमीम खान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि या १३ व्या पुरस्कारासाठी शुभेच्छा दिल्या.

अभिनेता आनंद बलराज म्हणाले की, शमीम खान यांनी मुंबईत टिफा पुरस्कार २०२५ ज्या पद्धतीने सादर केले आहे ते खूपच भव्य आणि अतुलनीय आहे. रमाकांत मुंडे (मुंडे मीडिया) यांनी कार्यक्रमाची जनसंपर्क जबाबदारी अतिशय चांगल्या प्रकारे सांभाळली.

# घाटकोपर येथे दहीहंडी मोठ्या उत्साहात संपन्न



**घाटकोपर । प्रतिनिधी** - महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आमदार व घाटकोपर विभाग प्रमुख दिलीपमामा लांडे, महाड-पोलादपूर तालुक्याचे आमदार व मंत्री भरतशेठ गोगावले आणि आमदार तुकाराम काते यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर वासियांसाठी भव्य दिव्य दहीहंडी उत्साहाचे आयोजन घाटकोपर शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १२७ अमृत नगर ट्रान्झिट कॅम्प याठिकाणी करण्यात आले होते.या दहीहंडी स्पर्धेत घाटकोपर मधील गोविंदा पथकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.तसेच यावेळी ५/६/७ थरांची यशस्वी सलामी देऊन गोविंदाचा जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी प्रत्येक सहभागी गोविंदा पथकाला रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.हा दहीहंडी उत्सव फक्त घाटकोपरमधील गोविंदा पथकांसाठी खास आयोजित करण्यात आला होता.आपल्या मराठी माणसाने आपले सण व परंपरा जपली पाहिजे हाच या आयोजना मागचा एकमेव उद्देश होता.या उत्सवाचे यशस्वी आयोजन घाटकोपर शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी महिला गोविंदा पथकांनी या दहीहंडी उत्सवात मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता.

पान १ वरुन

## मराठवाड्यात अनेक ...

द्याव्यात. आवश्यकतेनुसार नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे.

आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवाव्यात.

घडणाऱ्या घटनांची माहिती तात्काळ विभागीय कार्यालयास कळवावी.

**अलर्टचे स्वरूप**

यलो अलर्ट (परभणी, हिंगोली, नांदेड, धाराशिव) : सामान्य मुसळधार पावसाचा इशारा. नागरिकांनी काळजी घ्यावी.

ऑरेंज अलर्ट (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर) : मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता. पूरस्थितीची शक्यता असून प्रशासनाने विशेष खबरदारी घेणे आवश्यक.

## व्यापाऱ्यांची ...

पो.उपनिरीक्षक योगेश चव्हाण, सुनील पाटोळे, सचिन चौधरी, सचिन मान्टे, पोलीस शिपाई दिलीप गुसींगे यांनी प्रभावी तपास केला.

जालन्यातील या कारवाईमुळे व्यापाऱ्यांना दिलासा मिळाला असून, सायबर पोलिसांच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मरावे परी अवयव दानरुपी उरावे

अवयव दान, देह दान श्रेष्ठ दान असे फक्त बोलायला सांगायला चर्चा करायला छान वाटते.प्रत्यक्षात मात्र तशी वेळ आली कि त्यात कातडी बचाव व निर्णय न घेण्याची उदासीनताच जास्त दिसते हि वस्तुस्थिती आहे.माझ्या मते अवयव दान म्हणजे माणुसकीच्या सर्वोच्च अविष्कार वाटतो. कोणत्याही जाती धर्माच्या लोकांना आपल्या माणसाच्या शरीराची चिरफाड,देहाची विटंबना सहन करण्याची क्षमता नसते.अभद्र विचारांची धारणा मनात घर करून बसलेली असते. अंत्यसंस्कार करताना शेवटचे डोळे भरून पाहता यावे मृतदेहाचे चेहरा उघडा ठेवला जातो.जगातील सर्व धर्म सेवा,करुणा आणि मानवतेचा संदेश देतात मग अवयव दान करा ज्याच्याने एखाद्याचा जीव वाचेल ज्याने अवयव दान केले त्याचीही स्मृती जागृत राहील हे मनावर बिंबवण्यात आपण कमी का पडतो.अवयव दान हि केवळ सामाजिक बांधिलकी नाही तर देशभक्ती आहे,धर्म आहे,मानवतेची हाक आहे. आयुष्यभर आपण आपल्या अवयवाचा उपयोग केला,पण मृत्यनंतर ते जळून जातात किव्वा मातीत मिसळून जातात,ते जर कोणाच्या श्वासाचे कारण बनत असतील तर त्यासारखे मोठे पुण्यकर्म नाही.मृतदेह



छिन्न विच्छिन्न दिसणार नाही याचीही दक्षता घेतली पाहिजे. कोणावर सक्तीही करणे योग्य नाही.जगातली सर्वात मोठी जनसंख्या असलेला आपल्या देशात शाळा.महाविद्यालय,रुग्णालय,खासगी,सरकारी कंपन्या व आस्थापना,गृहनिर्माण संस्था अश्या अनेक जेथे जनसंपर्क करून अवयव दानाचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांचे समुपदेशन केले तर नक्कीच सकारात्मक बदल घडू शकतो. भिंती पत्रके, महामार्गावर मोठे होर्डिंग्स, चित्रपटगृहे, टीव्ही, वर्तमानपत्रे द्वारे निशुल्क जनजागृती करायला हरकत नाही. अवयवदानीचे फॉर्म भरून तशी नोंद करून ठेवली तर कुठेही मृत्यू झाला तरी तातडीने त्याच्या अवयवांचा उपयोग करता येऊ शकेल. एका निरोगी माणसाच्या शरीरातील हृदय, डोळे, यकृत, फुफ्फुस, मूत्रपिंड सारखे उपयोगी अवयव एकाच वेळी चार ते पाच जणांचे जीव वाचवू शकतात. ह्या अवयवांचे बाजारीकरण होणार नाही ह्याची दक्षता घेतली पाहिजे.बलात्कारी. खुनी,देशद्रोही अश्या व्यक्तींना अवयव दान करू नये.ज्यांची आर्थिक स्थिती कोलमडली असेल अश्या मृतांच्या नातेवाईकाना मदत करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थाचा आर्थिक भार उचलण्यास हरकत नाही.

मरावे परी अवयव दानरूपी उरावे हि मनीषा प्रत्येक भारतीयांनी मनात रुजवावी हि सदिच्छा.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**<br>
**(नवी मुंबई ) फोन नं. ९९२०७७६२७७**

# शालेय पोषण आहार कामगारांचे थकीत मानधन व थकीत इंधन बिल त्वरित अदा करा

## सिटू सलग्न शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे जिल्हा परिषदेसमोर भरपावसात निदर्शने

**जालना । प्रतिनिधी** - सिटू प्रणित जालना जिल्हा शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे जिल्हा परिषदेसमोर शालेय कामगारांच्या विविध मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली. निदर्शनानंतर शिक्षणाधिकारी श्रीमती भागवत मॅडम यांना निवेदन देऊन कामगाराच्या प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.दिलेल्या निवेदनात म्हटले की, जालना जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून यामध्ये विशेषतः विधवा, परित्यक्ता,दलित ,आदिवासी, अल्पसंख्यांक महिला कामगार जास्त प्रमाणात आहे. या कामगारांना अत्यंत कमी मानधनावर काम करावे लागत आहे. परंतु अत्यंत कमी व तुटपुंजे मानधन असून देखील ते वेळेवर मिळत नाहीत. यामुळे या कामगारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. त्याचबरोबर काही कामगारांकडे इंधन भाजीपाला देखील असून त्याचे देखील मार्चपासून चे बिल थकलेले आहे. त्यामुळे शालेय पोषण आहार कामगार अत्यंत अडचणीत सापडले आहे. निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या. १. शालेय कामगारांचे एप्रिल,जुलै -२०२५ थकीत मानधन त्वरित अदा करा. २. मार्च -२०२५ पासून चे थकीत इंधन बिल व भाजीपाला बिल त्वरित अदा करा.३. मुख्याध्यापकाकडून व शाळा व्यवस्थापन समितीकडून कामगारांवर अतिरिक्त कामे लादण्याचे कामे करत आहे.४. शालेय पोषण आहार कामगारांना किमान वेतनानुसार २६००० रु.मानधन द्या.५. दि.१८ डिसेंबर २०२३ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकांना आदेशित करावे. ६. २००५ च्या शासन निर्णयानुसार सनियंत्रण समिती स्थापन करून त्यामध्ये संघटनेचा एक प्रतिनिधी घ्या.७. शालेय पोषण आहार कामगारांना १० महिन्याऐवजी १२ महिने मानधन द्या.८. सन २०२४ मध्ये केलेली वाढ त्वरित कामगाराच्या खात्यात जमा करा.९. इंधन भाजीपाला, कामगारांना कामावरून कमी करू नये. व जुन्या कामगारांकडून करारनामा घेणे बंद करा.१३.शालेय पोषण आहार कामगारांना स्वयंपाकी व मदतनीस चा दर्जा द्या व त्यांना संघटनेचे अध्यक्ष मधुकर मोकळे, सरचिटणीस ड.अनिल मिसाळ, बाबासाहेब पाटोळे, अशोक साळवे मिरा देशमुख, गोविंद चांदगुडे, लता वीर, मीरा




पूरक आहार व खिचडीचे साहित्य आणण्याचा अधिकार कामगारांना द्या.१०. शालेय पोषण आहार कामगारांना गणवेश व इतर अत्यावश्यक साहित्य देण्यात यावे. १२.विनाकारण विनाचौकशी चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून मान्यता द्या. १५. शालेय पोषण आहार कामगारांची भरती करताना पटसंख्येची अट रद्द करा. शालेय पोषण आहार कामगारास शासकीय कर्मचारी दर्जा द्या. यावेळी पुंगळे, लक्ष्मण धोंडगे, सावित्रा इस्तापी, प्रतिभा काळे, यशोदा गावंडे, संगीता तांबे, संगीता पवार, विमल कोल्हे, मंगल दाभाडे यांच्या शालेय कामगार उपस्थित होते.

# गवळी गल्लीत श्रीकृष्ण मूर्ती स्थापना; उत्साहात गोकुळ मित्र मंडळाची तयारी




**परतूर । प्रतिनिधी** - परतूर शहरातील गवळी समाजाचे आराध्य दैवत श्रीकृष्ण मूर्ती स्थापनेची तयारी मोठ्या उत्साहात सुरू झाली आहे. गवळी गल्लीतील गणपती मंदिरात २० ऑगस्ट रोजी मूर्तीची प्रतिष्ठापना होणार असून या पार्श्वभूमीवर १९ ऑगस्ट रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

ही मिरवणूक गवळी गल्लीपासून शिवाजी नगर महादेव मंदिरापर्यंत निघणार असून पारंपरिक वाद्य, ढोल-ताशे, टाळ-मृदुंग यांच्या गजरात शेकडो भक्त सहभागी होणार आहेत. शहरातील विविध सामाजिक संस्था, तरुण मंडळे, महिला मंडळे यांचाही मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहे.

मिरवणुकीनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे २० ऑगस्ट रोजी गवळी गल्लीतील गणपती मंदिरात मूर्ती स्थापना सोहळा पार पडणार आहे. या वेळी ह.भ.प. गणेश महाराज जाधव यांचे हरिकिर्तन होणार असून त्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकल गोकुळ मित्र मंडळाच्या वतीने आयोजकांनी सर्व श्रद्धावानांनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# सिंगोना शाळेत एक पेड माँ के नाम अभियान



**परतूर । प्रतिनिधी** - परतुर तालुक्यातील सिंगोना येथे जि.प. प्रा शाळेत १५ ऑगस्ट रोजी एक पेड माँ के नाम अंतर्गत विद्यार्थ्यांना झाडे वाटप करण्यात आली. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुंजाराम कदम, कैलासराव सोळंके, सरपंच, ज्ञानेश्वर मांटे, अशोक वाघमारे व प्रतिष्ठित नागरिक, अंकुशराव लांडगे.बाबूराव गरड.हरिभाऊ सोळंके.येणूबाई लांडगे. कालींदा गरड. शाळेतील मुख्यध्यापक, सी.टी.काकडे, सहशिक्षक,डी.आर.लहाने, आर. एन.सावंत. श्रीमती एस.व्ही.कुलकर्णी, श्रीमती ए.सी.ससाणे. श्रीमती ए.पी.सोईतकर.आणि गावकरी यांच्या उपस्थिती हा कार्यक्रम पार पडला आहे.

# डोंबिवली पश्चिम भगवान काटे नगरमधील रहिवाशांचे आंदोलन

## रेल्वे प्रशासनाकडून नोटीसांमुळे उद्भवलेली चिंता



**डोंबिवली । प्रतिनिधी** - डोंबिवली पश्चिमेतील भगवान काटे नगर परिसरात गेल्या पंधरा वर्षांपासून ४१० रहिवासी वास्तव्यास आहेत. लीलाबाई म्हात्रे एक ते चार चाळ, जोशी चाळ, सायलीला चाळ, विशाल म्हात्रे ओम साई चाळ, सरस्वती चाळ यामध्ये हे नागरिक वास्तव्यास आहेत.

मात्र काही महिन्यांपूर्वी सुमारे २०० रहिवाशांना रेल्वे प्रशासनाकडून नोटीस बजावण्यात आल्या, ज्यामुळे त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न गंभीर पातळीवर पोहोचला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी या नोटिसांविरोधात रहिवाशांनी एकत्र येऊन आंदोलन केले.

या वेळी रहिवाशांच्या वतीने जागृती जाधव, पुष्पा टेंभेकर, अनिल कासारे, गणेश मोहिते आणि गरिमा बारी यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना प्रशासनाने मानवी दृष्टिकोन ठेवावा, अशी मागणी केली.

आंदोलनाला स्थानिक नगरसेवक जनार्दन म्हात्रे, आर.पी.आय.चे पदाधिकारी माणिकराव उघडे व सावंत यांनी हजेरी लावून पाठिंबा दिला. नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे त्यांनी आश्वासन दिले.

याशिवाय आंदोलन यशस्वी करण्यासाठी सुनील बोर्ले, विकास जोंधळे, किरण कोलूस्ते, रामदास साठम, जगदीश दिवेकर, सचिन कांबळे, बबन बेर्डे, शिवशंकर दभडके, संदीप सावंत तसेच महिला प्रतिनिधींमध्ये श्रद्धा वाढवळकर, ज्योती दिवेकर आदी कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले.

भगवान काटे नगरमधील रहिवाशांचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यात गेला असून, रेल्वे प्रशासनाकडून मिळणाऱ्या प्रतिसादावरच पुढील लढ्याचे स्वरूप अवलंबून असेल.

# इस्त्राईल देशात होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स पदासाठी संधी

**जालना । प्रतिनिधी** - आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे. तरी इस्त्राईल देशामध्ये होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स म्हणुन रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यामध्ये जीडीए, एएनएम, जीएनएम, बीएसस्सी नर्सिंग आणि पोस्ट बीएसस्सी नर्सिंग या पदासाठी ५ हजार कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आलेली आहे. जालना जिल्ह्यातील २५ ते ४५ वयोगटातील पात्रताधारक उमेदवारांना इस्त्राईलमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. https://maharashtrainternational.com/jobDetail.aspx या लिंकवर नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# दत्ता खंदारे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रगौरव पुरस्काराने सन्मानित!



**मुंबई** - तीन दशकांहून अधिक काळ सामाजिक, विधायक कार्यात अग्रेसर राहणारे आणि लेखणीव्दारे वृत्तपत्रांतून समाजातील व्यथा, वेदना, समस्या आजही सातत्याने मांडत रहाणारे जेष्ठ वृतपत्र लेखक, पत्रकार,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता श्रावण खंदारे यांना ऑल इंडिया फिल्म प्रोड्यूसर टेक्निशियन अँड आर्टिस्ट युनियन च्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रगौरव पुरस्काराने जेष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर आणि जेष्ठ पत्रकार योगेश त्रिवेदी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपिठावर धडक कामगार युनियन चे अध्यक्ष श्री अभिजित दादा राणे, श्री नंदकिशोर खानविलकर(अध्यक्ष जनरल असोसिएशन), श्री हेमंत सामंत (अध्यक्ष गाडगे महाराज ट्रस्ट ),विलास खानोलकर (साहित्यिक ), कार्यक्रमाचे संयोजक श्री दिपक काळीगंण आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा मुंबई मराठी पत्रकार संघात संपन्न झाला.

# माणगावचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षितीज प्रकाशमान करणारा ‘प्रभाकर’ काळाच्या पडद्याआड!

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी** - माणगाव तालुक्याच्या सामाजिक , धार्मिक ,सांस्कृतिक, उद्योग आणि राजकीय क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव प्रभाकर दादा उभारे अर्थात प्रभाकर बाळाराम उभारे, माणगाव तालुक्यातील मौजे दाखणे या गावचे रहिवासी प्रभाकर दादा उभारे हे आपले जन्मदाते माता पिता आणि भावंडां समवेत व्यवसाया निमित्ताने माणगाव शहरातच स्थायिक झाले. पुढे त्यांनी हॉटेल व्यवसायात यशस्वी भरारी घेतली. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत माणगाव शहरातील निजामपूर रोड शेजारी असलेल्या हॉटेल बाळाराम, हॉटेल पांडव रेसिडेन्सी आणि लॉजिंग इत्यादीं सुप्रसिद्ध यशस्वी उद्योगांचे ते मालक. एवढे मोठे उद्योजक असूनही त्यांना त्याचा कोणताही प्रकारचा जराही इगो वा गर्व नव्हता. सर्वांना नेहमी प्रेमाची आणि सोजन्यशील वागणूक देणारे प्रभाकर दादा उभारे अत्यंत मितभाषी आणि हसतमुख होते. लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणारे प्रभाकर दादा उभारे हे लोकांच्या अडीअडचणीत नेहमीच धाऊन जात असत. त्यांना सहकार्य करत असत. गेली अनेक दशके तमाम माणगाव करांच्या मनावर,हृदयावर अधिराज्य करणार्या प्रभाकर बाळाराम उभारे यांचे पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारादरम्यान वयाच्या ७१ व्या वर्षी झालेल्या आकस्मिक निधनाची दुःखद वार्ता रविवार दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी सोशल मीडियावर झळकताच तमाम माणगाव कर शोकाकूल झाले. त्यांच्या अंत्ययात्रेला तमाम माणगाव कर, सर्व समाज घटकातील मान्यवर, सर्व सामान्य गोरगरीब जनता, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांची अंत्ययात्रा माणगाव विरेश्वर नगर येथील त्यांच्या निवासस्था पासून ते खांदाड स्मशानभूमी असा मार्गक्रमण करत माणगाव बाजारपेठेतून काढण्यात आली, अखेर माणगाव खांदाड स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर उभारे कुटुंबिय,त्यांचे असंख्य हितचिंतक आणि तमाम माणगाव कर यांच्या उपस्थितीत त्यांचे चिरंजीव डॉ. अमेय उभारे यांच्या हस्ते मुखाग्नी देऊन अंतिम संस्कार करण्यात आले.

प्रभाकर दादांनी माणगाव चे सरपंच ते माणगाव पंचायत समिती उपसभापती, सभापती आणि समन्वय समिती अध्यक्ष असा अविस्मरणीय आणि उल्लेखणीय राजकीय क्षेत्रातील प्रवास करत माणगाव तालुक्यावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला. दादांना पुढे संधी मिळाली असती तर त्यांनी नक्कीच राजकीय क्षेत्रातील उच्चतम शिखरं सहजपणे पादाक्रांत केली असती. कारण दादांचा स्वभाव माणसं जपणारा आणि जोडणारा होता. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा स्वभाव गुण होता. सर्व समाज घटकात वावरणाऱ्या प्रभाकर दादा उभारे यांचा लोकसंपर्क अत्यंत दांडगा होता.



माणगाव शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला क्रिडा क्षेत्रातील प्रभाकर दादा उभारे यांचे योगदान अतिशय मौलिक,उल्लेखनीय आणि अविस्मरणीय अविस्मरणीय असे आहे. माणगाव शहरात सामाजिक धार्मिक सलोखा कायम अबाधित ठेवण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असत. माणगाव शहरात सर्वप्रथम सार्वजनिक दहिहंडी उत्सव, सार्वजनिक नवरात्रोत्सव, होलिकोत्सव, कला क्रिडा, नृत्य महोत्सव इत्यादी प्रकारचे सांस्कृतिक उपक्रम स्वखर्चाने राबविण्यात किंबहुना हा सांस्कृतिक वारसा जपण्यात दादांचा सिंहांचा वाटा होता. दादांच्या माणगाव येथील निवासस्थानी सर्व समाज घटकातील लोकांची आपापल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी कायम रीघ लागलेली असायची. लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ते नेहमीच तत्पर असत. आपल्या लाघवी कार्यतत्पर निस्वार्थी स्वभावामुळे अफाट लोकप्रियता आणि लोकसंग्रह करणारा, कला क्रिडा आणि संस्कृतीची जाण असलेला लोकनेता, लोकनायक ज्याने माणगाव शहराच्या, तालुक्याच्या जनमानसात ,जनामनात व सामाजिक, शैक्षणिक, कला क्रिडा, राजकीय आणि सांस्कृतिक पटलावर अनेक दशकं अधिराज्य गाजवून आपल्या सत्कार्याची छाप उमटवली आणि माणगाव चे क्षितीज ज्याने तेजोमय प्रकाशित केले तो माणगाव चा प्रभाकर दुर्धर आजाराचा सामना करत काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचं सत्कार्य समस्त माणगाव करांच्या कायम स्मरणात राहील. काल कथित आदरणीय प्रभाकर दादा उभारे यांच्या स्मृतीस पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड बोरघर, माणगाव आणि सह परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनदेखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यदिना बरोबर निरंकारी मिशनने साजरे केले आत्मिक जागृतीचे पावन पर्व

# भक्तीमध्ये स्वातंत्र्याची मुक्ती - निरंकारी राजपिता रमितजी





**जालना । प्रतिनिधी -** संपूर्ण भारतवर्षात जिथे स्वातंत्र्याच्या ७९ व्या गौरवशाली वर्षांचा उत्सव साजरा केला, तिथे संत निरंकारी मिशनने आत्मिक स्वातंत्र्याच्या रूपात श्रद्धा आणि समर्पणाने युक्त अशा मुक्ती पर्व दिवसाचे आयोजन केले. हे पर्व केवळ एक स्मरण नाही, तर आत्मिक चेतनेची जागृती आणि जीवनाचा परम उद्देश याचे प्रतीक आहे. मुक्ती पर्व दिवसाचा मुख्य संत समागम आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन अध्यक्षतेखाली दिल्लीतील निरंकारी ग्राउंड क्र.८, बुराडी रोड येथे आयोजित करण्यात आला. तसेच विश्वभरातील मिशनच्या सर्व शाखांमध्येही मुक्ती पर्वाच्या निमित्ताने विशेष सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करत मिशनमध्ये होऊन गेलेल्या महान संतांना अभिवादन करण्यात आले. त्यामध्ये शहनशाह बाबा अवतारसिंहजी, जगत माता बुद्धवंतीजी, राजमाता कुलवंत कौरजी, माता सविंदर हरदेवजी, भाईसाहेब प्रधान लाभ सिंहजी व इतर अनेक समर्पित संतांचे हृदयपूर्वक स्मरण करुन त्यांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा प्राप्त करण्यात आली. स्थानिक स्तरावर संत निरंकारी सत्संग भवन, गांधी चमन, रेल्वे स्टेशन रोड, जालना येथे मुक्ती पर्व दिवसानिमित्त विशेष सत्संग समारोह आयोजित करण्यात आला ज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील भाविक भक्तगणांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. आध्यात्मिकतेच्या पवित्र वातावरणात समस्त भक्तगणांना संबोधित करताना निरंकारी राजपिताजी म्हणाले, की आज १५ ऑगस्टला संपूर्ण देश स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत आहे. त्याच वेळी संतजन याला मुक्ती पर्वाच्या माध्यमातून आत्म चेतना आणि भक्तीचा संदेश देऊन साजरा करत आहेत. जसे तिरंगा झेंडा आणि देशभक्तीपर गीतं स्वातंत्र्याचे प्रतीक आहेत तसेच एका भक्ताचे जीवन सेवा, समर्पण आणि भक्तीच्या सुगंधाने भरलेले असते. सतगुरूंनी दिलेल्या ब्रह्मज्ञानात खरे स्वातंत्र्य आहे जे आपल्याला मीपणा आणि अहंकारापासून मुक्त करते. मुक्ती पर्वाची मूळ भावना ही आहे, की जसे भौतिक स्वातंत्र्यता आपल्याला राष्ट्राच्या उन्नतीचा मार्ग दाखवते, तसेच आत्मिक स्वातंत्र्यता अर्थात जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्तता ही मानवी जीवनाची परम उपलब्धी आहे. ही मुक्ती केवळ ब्रह्मज्ञानाच्या दिव्य ज्योतीमुळेच शक्य आहे, जी आत्म्याला परमात्म्याशी जोडते आणि या मानवी जीवनाच्या वास्तविक उद्देशाचा बोध करून देते.

आमदार अर्जुन खोतकर यांनी पावसामुळे साचलेल्या गुडघाभर पाण्यातून प्रवास करत नुकसानीचा घेतला आढावा

# तातडीने पाण्याचा निचरा करण्याच्या मनपाला सूचना



**जालना । प्रतिनिधी -** आमदार अर्जुन खोतकर जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांनी पावसामुळे साचलेल्या गुडघाभर पाण्यातून प्रवास करत पाहणी केली व झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. शिवसेनेचे विभाग प्रमुख मनोज लाखोले यांनी आमदार अर्जुन खोतकर यांच्याकडे फोन द्वारे संपर्क साधला असताना आ. अर्जुन खोतकर यांनी कोठारी नगर येथे पाहणीसाठी दाखल झाले आहे. मुसळधार पावसामुळे जालना शहरातील कोठारी नगर भागात गुडघाभर पाणी साचले आहे.अनेक नागरीकांच्या घरात पाणी घुसले हौते यामुळे तेथील स्थानिक नागरिकांची तारांबळ उडाली व जनजिवन विस्कळीत होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. या परिस्थितीची आमदार अर्जुन खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांना सोबत घेऊन पाहणी केली व महापालिकेला त्यांनी तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत.व येथिल रहीवाशियाना धिर दिला. यावेळी दिनकर घेवंदे मनोज लाखोले उपासे सर मोरे साहेब संतोष शहागडकर गजू हिवाळे दीपक वैद्य अभिषेक काबली शिवसिंग तिलवारे ऋषिकेश शहागडकर निखिल गाडे आकाश जगताप अजित खेडकर जावळे साहेब गोपाल काका काबलिये सुमित शर्मा लड्डा साप सुनील भैया चांडक शहाणे साहेब राजु हिवाळे निहयल साहेब आदींची उपस्थिती होती.

कोठारी नगर भागात मोंढा भागातून येणारे पाणी येत असून मोंढा भागात आमदार अर्जुन खोतकर आयुक्त खांडेकर शिवसेना शहर प्रमुख पाचफुले यांनी आढावा घेतला आहे महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना पाणी कोठारी नगर कडे येणार पाणी बंद करण्याचे आदेश आमदार अर्जुन खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दिले आहे आमदार अर्जुन खोतकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी स्वतः उभे राहून काम करून घेतले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.